# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरूनगर
# विद्यार्थी कल्याण मंडळ,
# कमवा व शिका योजना २०१५–१६

## *वार्षिक अहवाल*

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयामध्ये विद्यार्थी कल्याण मंडळांतर्गत दरवर्षी अनेक उपकम राबविले जातात. शैक्षणिक वर्ष 2015–16 मध्ये विद्यार्थी कल्याण मंडळाने कमवा व शिका ही योजना अतिशय प्रभावीपणे राबविली. महाविद्यालय नियमितपणे चालू झाल्यानंतर प्रत्येक वर्गावर नोटीस फिरवून विद्यार्थ्यांना या योजनेविषयी माहिती देण्यात आली . त्यानंतर त्यांचेकडून प्रवेशअर्ज भरून घेण्यात आले. त्यानंतर ऑगस्ट महिन्यांपर्यंत सुमारे 150 विद्यार्थ्यांनी कमवा व शिका योजनेसाठी अर्ज केले. मात्र त्यापैकी 106 विद्यार्थ्यांना काम उपलब्ध झाले.

विद्यार्थ्यांवर श्रमाचे संस्कार व्हावेत तसेच त्यांना शिक्षणासाठी थोडी आर्थिक मदत व्हावी, हे कमवा व शिका योजनेचे उद्दिष्ट डोळयापुढे ठेवून या योजनेची कार्यवाही करण्यात आली. महाविद्यालयात कमवा व शिका योजनेत काम करताना मुलांपेक्षा मुलींची कायमच आघाडी राहिलेली आहे. 106 विद्यार्थ्यांपैकी 79 मुली व 27 मुले असे गुणोत्तर आढळून आले. या विद्यार्थ्यांना श्रमाचे

संस्कार होण्याबरोबरच काही नविन शिकायला मिळावे, त्यांच्या सुप्त गुणांना संधी मिळावी म्हणून त्यांना वेगवेगळया प्रकारची कामे देण्यात आली. वाणिज्य शाखेच्या सुमारे 7 मुलींना कार्यालयामध्ये संगणकाचा अनुभव येण्यासाठी संगणकावर काम दिले. कला व वाणिज्य शाखेच्या 6 मुलींना विद्यार्थी ग्राहक भांडारामध्ये काम दिले. तेथे फाईल तयार करणे, हिशोब ठेवणे, व्यवस्थापन कौशल्य हे अनुभव विद्यार्थ्यांना मिळाले. ग्रंथालयामध्ये 20 मुलींना काम देण्यात आले. विज्ञान शाखेच्या मुलींना व मुलांना प्रयोगशाळेमध्ये काम देण्यात आले. काम देण्यात आले. तेथे 15 विद्यार्थ्यांने काम केले. 4 मुलींना परीक्षा विभागात काम देण्यात आले.

कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांनी ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यांमध्ये जास्त काम केले. ऑक्टोबर महिन्यामध्ये परीक्षा आल्यामुळे ब–याचशा विद्यार्थ्यांनी काम थांबविले.

कमवा व शिका योजनेवर यावर्षी 333870 रू. एवढा खर्च झाला. त्यापैकी मागासवर्गीय विद्यार्थिनींवर 22830 व विद्यार्थ्यावर 15210 इतका खर्च झाला. खुल्या प्रवर्गातील विद्यार्थिनींवर 213540 व विद्यार्थ्यावर 82290 एवढा खर्च झाला.

ही योजना यशस्वी करण्यासाठी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.ॲड.देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष मा. प्रतापराव टाकळकर, मानद सचिव मा.ॲड. राम कांडगे, तसेच सर्व संचालक मंडळ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ व

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच सर्व विभाग प्रमुख, प्रयोगशाळा सहाय्यक, प्रबंधक श्री.के.आर.पाचारणे, कार्यालय अधिक्षक श्री. अे.के.अंकुश, एन.एस.एस कार्यकम अधिकारी डॉ.एस.डी.शिंदे व कनिष्ठ लघुलेखक श्री.व्हि.डी.गरूड या लोकांनी योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी सहकार्य केले.

डॉ.पी.एस.कुलकर्णी
विद्यार्थी कल्याण अधिकारी
हु.रा.महाविद्यालय,राजगुरुनगर
ता.खेड,जि.पुणे.

HUTATMA RAJGURU MAHAVIDYALAYA
RAJGURU NAGAR

प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील
**Principal**
*Hutatma Rajguru Mahavidyalaya*
*(Arts, Science & Commerce)*
*Rajgurunagar.*